**ठळक बातम्या**

- राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांचा शपथविधी, उत्पादन शुल्क, क्रीडा खात्याचा पदभार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून सुनेत्रा पवार यांचं अभिनंदन, शपथविधीच्या घाईबद्दल काँग्रेसकडून सवाल उपस्थित

- बार कौन्सिलच्या वकील प्रशिक्षण अकादमीचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नवी मुंबईत उद्घाटन

**आणि**

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन उद्या सकाळी ११ वाजता अर्थसंकल्प सादर करणार

<><><><><>

सुनेत्रा अजित पवार यांनी आज महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. लोकभवनातल्या दरबार हॉल सभागृहातल्या छोटेखानी कार्यक्रमात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यामुळं सुनेत्रा पवार या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातले मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपस्थित होते. त्यांच्याकडे उत्पादन शुल्क, क्रीडा, युवक कल्याण, अल्पसंख्यक विकास आणि औकाफ ही खाती सोपवण्यात आली आहेत.

तत्पूर्वी सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांच्याकडे पाठवला. त्यानंतर, मुंबईतल्या विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीत सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेते पदी निवड करण्यात आली. तसेच पक्षाबाबतचे निर्णय घेण्याचे सर्वाधिकारही त्यांच्याकडे सोपविण्यात आले. विधानभवनातल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या बैठकीत एकमताने हा निर्णय झाला. या बैठकीनंतर तातडीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी वर्षा निवासस्थान गाठत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यांची भेट घेत पक्षाने केलेल्या ठरावाची माहिती दिली. त्यानुसार सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्रीपदी नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला होता.

सुनेत्रा पवार यांच्या कारकिर्दीविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(वाणिज्य विषयात पदवीचं शिक्षण पूर्ण केलेल्या सुनेत्रा पवार यांचा जन्म १८ ऑक्टोबर १९६३ रोजी धाराशिव जिल्ह्यातल्या तेर या गावी झाला. त्यांचे वडील बाजीराव पाटील हे स्वातंत्र्य सैनिक होते तर मोठे बंधू पद्मसिंह पाटील यांनी राज्यात दीर्घकाळ मंत्रीपद भूषवलं आहे. जून २०२४ पासून त्या राज्यसभेच्या सदस्य होत्या. सध्या त्या विद्या प्रतिष्ठान, बारामती क्लब, बारामती हायटेक टेक्सटाइल पार्कसह एन्व्हायरमेंटल फोरम ऑफ इंडिया या गैर सरकारी संस्थेवर कार्यरत आहेत. याशिवाय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिनेटच्या आणि व्यवस्थापन समितीच्या त्या माजी सदस्य होत्या. पुणे विद्यापीठ आणि चिंचवड देवस्थानानं त्यांना जीवन गौरव पुरस्कारानं गौरवलं आहे. त्यांच्या प्रयत्नातून काटेवाडी गाव स्वच्छता अभियानात राज्यात पहिल्यास्थानी आलं तसंच निर्मल ग्रामची चळवळ यशस्वी करण्यातही त्यांचं महत्त्वाचं योगदान होतं. शाळा प्रवेश उत्सव ही त्यांची कल्पना पुढे राज्य सरकारनं सर्वत्र राबवली. हागणदारी मुक्तीसाठी त्यांनी राबवलेला उपक्रम पुढे राज्यात 'गुड मॉर्निंग पथक' नावानं सुरू झाला. त्यांच्याच प्रयत्नातून काटेवाडीमध्ये शून्य शिलकीची बचत खाती बँकांमध्ये सुरू झाली तसंच महा ई सेवा केंद्रांचाही प्रारंभ झाला. संगीत, छायाचित्रण, शेती यासह चित्रकलेचीही त्यांना आवड असून मुंबईच्या नेहरू सेंटरमध्ये त्यांच्या चित्रांचं प्रदर्शन भरवण्यात आलं होतं.)*

**<><><><><>**

आदरणीय अजित पवार यांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. आज त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत 'शिव-शाहू-फुले-आंबेडकर' यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्य भावनेने उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारताना मन अक्षरशः भरून येत असल्याची प्रतिक्रिया सुनेत्रा पवार यांनी दिली आहे. त्यांच्या अकाली जाण्याने मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला असला, तरी अजित पवार यांनी शिकवलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे. त्यांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित

महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे काम करत राहीन, असं त्या म्हणाल्या. या कठीण क्षणी महाराष्ट्रातील जनतेने दिलेला प्रेमाची साथ हेच माझे बळ आहे. आपल्या विश्वासाच्या जोरावर, दादांच्या विचारांना उजाळा देत, नव्या आशेने पुढे चालत राहीन. असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुनेत्रा पवार यांना शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यातल्या जनतेच्या कल्याणासाठी त्या अथक परिश्रम करतील आणि अजित पवार यांचं स्वप्न त्या पूर्ण करतील, अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्र्यांनी दिली आहे.  राज्याचे हित लक्षात घेऊन अतिशय कठिण परिस्थितीत सुनेत्रा पवार खंबीरपणे जबाबदारी स्वीकारत आहेत, हे कौतुकास्पद असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे.

राज्याला पहिल्यांदाच एक महिला नेतृत्व लाभलं आहे, ही बाब आपल्या महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे अशी प्रतिक्रिया भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिली आहे. अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर निर्माण झालेल्या राजकीय पोकळीत अत्यंत संयमी, कर्तव्यभावना आणि जबाबदारीची जाणीव ठेवत त्यांनी हे महत्त्वपूर्ण दायित्व स्वीकारले आहे. हा निर्णय अजित पवार यांच्या विचारांना, कार्याला आणि स्वप्नांना दिलेली मानवंदना आहे, असं ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार फौजिया खान यांनी सुनेत्रा पवार यांना शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री म्हणून त्या उत्तम कारभार करतील, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. आमदार रोहित पवार यांनीही सुनेत्रा पवार यांच्या शपथविधी बद्दल आनंद व्यक्त केला आहे. अजित पवार यांची जागा कुणीच कुणीच घेऊ शकत नाही पण किमान सुनेत्रा पवार यांच्या रुपात तरी आम्ही तिथं अजित पवार यांना पाहू, असं ते म्हणाले.

सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीवर काँग्रेसनं काही सवाल उपस्थित केले आहेत. सरकारकडे एवढं बहुमत असताना अशाप्रकारची घाई अनाकलनीय असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. तर राष्ट्रपती, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री यासारखं उपमुख्यमंत्री हे घटनात्मक पद नसताना एवढ्या घाईत शपथविधी का झाला हे राष्ट्रवादी काँग्रेसचं सांगू शकते असं काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले.

**- - होल्ड - अतुल लोंढे बाइट - - -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या अस्सल मराठमोळ्या मातीतला, आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष हा कोणीही मराठी असावा, पाटील असावा पण पटेल नाही, अशी प्रतिक्रिया मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिली आहे.

<><><><><>

सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीला त्यांचे धाकटे चिरंजीव जय पवार वगळता पवार कुटुंबातलं कुणीही उपस्थित नव्हतं. सकाळीच घेतलेल्या पत्रकार परिषदेत हा शपथविधी होणार असल्याची काहीही माहिती नसल्याचं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्पष्ट केलं होतं. त्यानंतर दुपारी खासदार सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्या मातोश्रींची भेट घेतली. त्यानंतर वार्ताहरांनी विचारल्यावर या शपथविधीची काहीही माहिती नसल्याचं त्या म्हणाल्या. उद्या देशाचा अर्थसंकल्प सादर होणार असल्यानं दिल्लीला जाणार आहे. त्यापूर्वी आशा काकी यांची भेट घेण्यासाठी आले होते असं त्यांनी सांगितलं. अजित पवार यांचे मोठे चिरंजीव पार्थ पवार यांनी आज बारामतीमध्ये शरद पवार यांची भेट घेतली. तो आजी - आजोबांची भेट घ्यायला आला होता. याशिवाय अधिक माहिती द्यायला सुप्रिया सुळे यांनी नकार दिला.

<><><><><>

नवी मुंबईतल्या तळोजा इथं महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वकील प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेच्या इमारतीचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आलं. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, ज्याप्रमाणे न्यायमूर्तींसाठी प्रशिक्षण संस्था आहेत, त्याप्रमाणे वकिलांसाठी प्रशिक्षण संस्था का नाही, याचं उत्तर आज बार कौन्सिलने दिलं आहे. नवीन फौजदारी कायदे, तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यासाठी प्रशिक्षित वकील आणि अभियोजक तयार करणं, आवश्यक असल्याचं ते म्हणाले. संस्थेसाठी राज्य शासनाकडून १० कोटी रुपयांचे अनुदान आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर वितरित केलं जाईल, असं आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिलं.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन उद्या सकाळी ११ वाजता लोकसभेत अर्थसंकल्प सादर करतील. हा त्यांचा विक्रमी सलग नववा अर्थसंकल्प आहे. एकाच प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारमध्ये त्यांनी हे अर्थसंकल्प सादर केले आहेत.

यापूर्वी प्रधानमंत्री म्हणून मोरारजी देसाई यांनी एकूण १० अर्थसंकल्प सादर केले आहेत. पण ते सलग नव्हते. पी. चिदंबरम यांनी ९ तर प्रणव मुखर्जी यांनी ८ अर्थसंकल्प मांडले आहेत. पण त्यावेळी प्रधानमंत्री वेगवेगळे होते.

अर्थसंकल्प असल्यानं देशातल्या शेअर बाजारात उद्या नियमित वेळेनुसार व्यवहार होणार आहेत. अर्थसंकल्पानिमित्त उद्या आकाशवाणीवर आपल्याला विविध चर्चात्मक कार्यक्रम आणि अर्थसंकल्पाचं विश्लेषण ऐकता येईल. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरुन प्रसारित होणाऱ्या दुपारच्या राष्ट्रीय बातम्या दुपारी १ वाजून ५० मिनिटांनी प्रसारित होतील.

//<><><><><>//